महाराष्ट्र शासन

दुरध्वनी : - ०२४६२-२१६३१६
E-mail Id- ig.nandedrange@gmail.com

नियंत्रण कक्षः - ०२४६२-२१६२५३
पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड-४३१६०३

जा.क्र.पोउपमनि/ आस्था-२/स.सा.ब-२०२५/विनंती- कश्रेलि/२०२५ दिनांकः- ३०/०५/२०२५ 30 MAY 2025

वाचा :- १. महाराष्ट्र शासकिय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकिय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम - २००५ दिनांक २५.०५.२००६.

२. महाराष्ट्र शासकिय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकिय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम - २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश क्रमांक ६, दिनांक २९.०८.२०२४

## -: आदेश :-

महाराष्ट्र शासकिय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन आणि शासकिय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (१) व (२) नुसार आणि शासन अधिसूचना, गृह विभाग क्र.टीआरएन /०३११ /१३३५ / प्र.क्र.२९१/पोल-५ब, दि.२९.०३.२०११ अन्वये दिलेल्या अधिकारानुसार तसेच शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.२६/१२ दि.३१.०१.२०१४ मधील तरतूदीनुसार स्थापन केलेल्या नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी विचारात घेवुन नांदेड परिक्षेत्रातील, जिल्हा लिपीक संवर्गातील खालील नमुद **कनिष्ठ श्रेणी लिपीक यांची,** त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये **विनंतीवरुन, स्वः खर्चाने** बदल्या करण्यात येत आहेत.

| अ क्र. | कनिष्ठ श्रेणी लिपीक यांचे नाव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | बदलीवरील नवीन नेमणुकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | श्रीमती मीरा अशोक शिंदे | पो.अ.कार्यालय, हिंगोली | पो.अ.कार्यालय, नांदेड |
| २. | श्रीमती सिताबाई संतोष खुपसे | पो.अ.कार्यालय, लातूर | पो.अ.कार्यालय, नांदेड |
| ३. | श्री संतोष गंगाधर बकान | पो.अ.कार्यालय, नांदेड | पो.अ.कार्यालय, परभणी |
| ४. | श्री अजिज महमद प्यारेवाले | पो.अ.कार्यालय, नांदेड | पो.अ.कार्यालय, हिंगोली |
| ५. | श्री नरेंद्र नाथराव कुलकर्णी | रारापोबल गट क्र.१२, हिंगोली | पो.अ.कार्यालय, नांदेड |

२. **वरिल कनिष्ठ श्रेणी लिपीकांच्या बदल्या त्यांच्या विनंतीवरुन करण्यात आलेल्या असल्याने त्यांना पदग्रहण अवधी व प्रवासभत्ता देय राहणार नाही.**

३. वर नमुद कनिष्ठ श्रेणी लिपीकांच्या विनंती बदलीचा विचार करतांना विनंती, अडचणी, रिक्त पदे व प्रशासकिय बाबी विचारात घेवुन बदल्या करण्यात आलेल्या आहेत.

४. बदलीच्या आदेशांची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरीता पुढील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

- बदली बाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर पर्यायी कनिष्ठ श्रेणी लिपीकांची हजर होण्याची वाट न पहाता बदली झालेल्या कनिष्ठ श्रेणी लिपीकांना बदली ठिकाणी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे. तत्पुर्वी बदली झालेल्या कनिष्ठ श्रेणी लिपीकाने त्यांच्याकडील प्रलंबित संदर्भ व प्रतिक्षाधिन प्रकरणांची यादी पदमोचक लिपीक किंवा संबंधीत कार्यालय प्रमुख यांचेकडे न चुकता द्यावी. त्याशिवाय बदलीवर कार्यमुक्त होता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.
- बदली झालेल्या व कार्यमुक्त केलेल्या कनिष्ठ श्रेणी लिपीकांना संबंधीत घटक प्रमुखांनी विनाविलंब रुजू करुन घ्यावे. तसेच, ते हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावा. एखाद्या कनिष्ठ श्रेणी लिपीकास रुजू करुन न घेतल्यास सक्तिचा प्रतिक्षाकाळ ठरवुन काम न देता वेतन भत्ते देण्याचा प्रश्न उद्भवल्यास संबंधीत घटक प्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल.
- बदली झालेल्या कनिष्ठ श्रेणी लिपीकांनी त्यांची पदस्थापना केलेल्या कार्यालयात तात्काळ रुजू व्हावे.

**( शहाजी उमाप )**
पोलीस उप महानिरीक्षक,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड

प्रति,

पोलीस अधीक्षक, नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली.
समादेशक, रारापोबल गट क्र.१२, हिंगोली.

**प्रत सविनय सादर**

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.